

अपशिंगे (मि.) : शिबिराच्या शुभारंभप्रसंगी वाय. आर. निकम, डॉ. अनिलकुमार वावरे, तुषार निकम व इतर.

# छत्रपती शिवाजी कॉलेजच्या श्रमसंस्कार शिबिराचा प्रारंभ

**सातारा, दि. १९ (प्रतिनिधी)** - छत्रपती शिवाजी कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर अपशिंगे (मि.) ता. सातारा) येथे उत्साहात प्रारंभ करण्यात आला. छत्रपती शिवाजी कॉलेज, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ सातारा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर अपशिंगे मिलिटरी येथे दि. १६ ते २२ जानेवारी या कालावधीत होत आहे. या शिबिराचे उदघाटन माजी शिक्षणाधिकारी वाय. आर. निकम यांच्या उपस्थितीत करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिलकुमार वावरे होते. वाय. आर. निकम यांनी अपशिंगे गावचा इतिहास त्याचबरोबर पहिल्या महायुद्धापासून या गावाला सैन्य दलाची लाभलेली परंपरा याचा परामर्श घेतला. डॉ. अनिलकुमार वावरे म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी समाजसन्मुख होऊन स्वतःचा व पर्यायाने समाजाचा विकास घडवावा. यावेळी अपशिंगेचे सरपंच तुषार निकम, तुकाराम निकम, किसन निकम, सुभेदार सुधीर करंडे, प्राचार्य रामकृष्ण निकम, रमेश निकम, जयसिंग मोरे आणि विजेता अकॅडमीचे संस्थापक अध्यक्ष विक्रमसिंह घाडगे, उपप्राचार्य रामराजे मानेदेशमुख, ज्युनियर विभागाचे प्रमुख प्रा. गणेश पाटील तसेच महाविद्यालयातील सर्व कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील प्राध्यापक, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होते. डॉ. विद्या नावडकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रास्ताविक व स्वागत राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा. नवनाथ इप्पर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. गणेश लोहार यांनी करून दिला.